# प्रस्तावना

भारत हा संस्कृतीप्रधान देश् आहे, या देशामध्ये विविध प्रकारच्या जाती - धर्माचे, संस्कृतीचे व वेगवेगळया भाषा बोलणारा जनसमुदाय राहतो. समाजव्यवस्थेच्या जडणघडणीमध्ये संस्कृतीला अंत्यंत महत्वाचे स्थान आहे. संस्कृती पशुत्ववृत्तीचा नाश करुन मानवतेचा विकास करते. म्हणजेच सामाजिक परिवतनामध्ये संस्कृती व त्यातील बदल महत्वाचे असतात. अशा जनसमुदायाच्या कालानुरुप बदलत्या समाजरचनेमुळे समाजात एकसारखेपणा निर्माण झाला नाही. यामुळे विविध राज्ये व शासक निर्माण् झाले. त्यांची कार्य समाजामधील गुन्हेगारी प्रवृत्ती नष्ट करुन कल्याणकारी समाज निर्माण करणे हे होते. त्यामुळे पोलीस प्रशासनाची निर्माती करण्यात आली. पोलीस प्रशासनाचा समाजाशी प्रत्यक्ष संबध असल्याने सहाजीकच पोलीस – जनता यांचे संबध आले, हे संबध काळानुरुप बदलत गेल्याचे दिसुन येते. कार्यक्षम पोलीस दलाच्या निर्मीतीसाठी समाजजिवनाशी सुसंगत अनेक बदल यापुर्वी वेळोवेळी करण्यात आले. परंतु एका काळात असलेल्या समस्या परावर्तीत काळात तशास असतील याची शाश्वती नसते. सध्या समाजाच्या जिवनशैलीचे अवलोकन केले असता विविध प्रकारचे गुन्हे वाढत असल्याचे जसं की बाल गुन्हेगारांचे वाढते प्रमाण, स्त्रीयांवर होणारे गुन्हे, सायबर गुन्हे, जातीय दंगली, सण उत्सवामध्ये होणारे गुन्हे अशा प्रकारच्या गुन्हयामध्ये वाढ होत आहे. असे गुन्हेच मुळात होऊ नयेत तसेच स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने भारतीय नागरिकांना दिलेल्या स्वातंत्र व सुरक्षिततेची हमी नियमती पणे आबादीत रहावी या करीता कायदा व सुव्यवसथेच्या दृष्टीने पोलीस व जनता संबधाला अनन्यसाधारण महत्व आलेले आहे.

निर्माण केलेल्या पोलीस यंत्रणेचे देशामधील कायदा व सुव्यवस्था आबादीत ठेवणे हे मुख्य कर्तव्य आहे. एखाद्या समाजामध्ये सुरक्षेचा प्रश्न जेव्हा मोठा होतो, सामान्य नागरिकांना जिथे सुरक्षित वाटत नाही, तिथे प्रश्न हा पोलिसांचा नसून त्या समाजाच्या एकूणच स्वास्थ्याचा आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. समाजाच्या कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नाकडे बघताना समाजाची वीण अधिक घट्ट कशी होईल आणि गुन्हेगारी प्रवृत्ती कशी कमी होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. महाराष्ट्राचे आज तेच झाले आहे. महाराष्ट्राला भयमुक्त आणि सुरक्षित बनवायचं असेल तर सध्याच्या परिस्थितीमध्ये कायदा व सुव्यस्था हाताळतांना काही मूलभूत बदल करण्याची गरज आहे. याच बदलाविषयी आपण कायदा व सुव्यवस्था सांभळतांना पोलीस व जनता यांच्यामधील सुसंवाद या E – Learning Module मध्ये अभ्यासणार आहोत.

# कायदा म्हणजे काय?

कायदा हे समस्यांचे समाधान करण्याचे एक शास्त्र आहे. हे शास्त्र नैतिक स्वरुपाचे असुन न्याय या तत्वावर आधारलेले आहे. यामुळेच समाजव्यवस्थेसारख्या गुंतागुतीच्या प्रक्रियेत देखील सामाजिक न्याय अस्तित्वात असतो हे लक्षात येते. अर्थात कायद्याची अंमलबजावणी हि एक प्रगत स्वरुपाची कला असुन त्यासाठी कौशल्यपुर्णता अंगी असणे आवश्यक आहे.

स्वॅनसन अँड टोरीटो यांचे मते " कायद्याचे प्राथमिक लक्षण म्हणजे कायद्याची लवचिकता हे असुन त्याच्या कार्यामुळे तो विकसित होत जात असतो"

कायदा म्हणजे काळजीपुर्वक लिखित असे विधान असते, जे निश्चित व सरळसरळ रितीने अंमलबजावणीसाठी तयार केलेले असते, ज्यामुळे समाजात शांतता, समाधान आणि सामाजिक न्याय प्रस्थापित केला जातो.

एस.एस. खेरा यांचे मते "कोणताही अपवाद नसलेला प्रत्येकाच्या सुरक्षिततेशी संबधित नियम म्हणजेच कायद्याची अंमलबजावणी असते "

मॅकआयव्हर यांच्या मते " राज्याच्या न्यायालयांनी मान्य केलेल्या, अर्थ लावलेल्या विशिष्ट स्थितींना लागु केलेल्या विशिष्ट नियमांचा संच म्हणजे कायदा होय "

ऑस्टीन यांच्या मते " कायदा म्हणजे वरिष्ठाने कनिष्ठाला दिलेली आज्ञा होय" "कृतीची आवश्यकता व्यक्त करणारा, कृती हाच पर्याय आहे असे सांगणारा नियम म्हणजे कायदा होय "

# सुव्यवस्था म्हणजे काय?

सुव्यवस्था म्हणजे ज्याची अंमलबजावणी होउ शकते अशा प्रकारचा नियम म्हणजे कायदा असतो व ज्याची अंमलबजाणी शक्य नाही किंवा होत नाही त्याला कायदा म्हण्यात काही अर्थ नाही. सुव्यवस्था अशी एक प्रक्रिया असते की, ज्याव्दारे समाजातील विविध संस्थाच्यामध्ये सुसंवाद प्रस्थापित करता येतो किंवा केला जातो आणि अनुभवता देखील येतो. अशा रितीने कायदा व सुव्यवस्था यांना एकमेकापासुन विलग करता येत नाही. त्या एका नाण्याच्या दोन बाजु आहेत. अशा कोणत्याही कायद्याच्या अस्तित्वाची कल्पना होउ शकत नाही, कि ज्याव्दारे समाजात शिस्त प्रस्थापित होउ शकत नाही. आणि असा कोणताही कायदा समाजात नसतो की, ज्याचे बंधन समाजाला पाळावे लागत नाही. कायद्याची अंमलबजावणी साधनांच्याव्दारे केली जात नसेल तर कोणत्याही सुव्यवस्थेची कल्पनाही समाजात करता येत नाही.

कायद्याची अंमलबजावणी केव्हाही निरर्थक असत नाही. कायद्याचे प्रशासन कायद्यासाठी नसते तर समजाता सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे ते एक साधन असते. त्यामुळे मुलभुत अर्थाने कायद्याची अंमलबजावणी समाजात शांतता, सुव्यवस्था, जिवित व वित्त हाणी रोखण्यासाठी असते. इतकेच नव्हे तर नागररिकांच्या मुलभुत हक्काचे संरक्षण यासाठीचे ते एक साधन असते. समाजात प्रतिनिधीच्याव्दारे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे कार्य केले जात असले तरी कायदा व सुव्यवस्था राखण्याचे कार्य समाजात करणारे पोलीस दल हे सर्वात महत्वाचे मानले जाते.

# कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता पोलीस व जनता यांचेध्ये सुसंवाद असण्याची गरज

कायदा आणि सुव्यस्था राखण्यात पोलीसांची महत्वाची भुमिका असली तरीही ज्या जनतेसाठी ते कार्यरत असतात त्यांचे आणि पोलीसांचे संबंध निश्चितपणे मित्रत्वाचे नाहीत. सर्वसाधारण असा समज आहे की, जनात पोलीसांचा तिरस्कार करते आणि पोलीस जनतेला अपमानास्पद वागणुक देतात. ब्रिटीश कालखंडापासुन सरकारसाठी कार्य करणारी पोलीस यंत्रणा जनतेशी मित्रत्वाचे संबध जोडण्यात अपयशी ठरली. सामान्यत: असे दिसुन येते की, पोलीस अधिकारी, कर्मचारी जनतेशी चांगले बोलतांना, त्यांच्याशी चांगले वर्तन करतांना दिसत नाही. महाराष्ट्रातील पोलीस व जनता यांचे संबध कशा प्रकारचे आहेत आणि अशा स्वरुपाचे संबध अस्तीत्वात असण्यामागची कारणे शोधुन त्यावर आवश्यक त्या उपाययोजना करणेसाठी अर्थात कायदा व सुवस्था राखण्याकरीता पोलीस व जनता यांचेमध्ये सुसंवाद असणे ही काळाची मुलभुत गरज आहे.

# कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवण्याची कारणे व त्यावरील सुसंवादाच्या मार्गाने करावयाचे उपाय

1) **जातीय तसेच विविध धार्मीक कारणांवरुन होणाऱ्या दंगली व सार्वजनिक उत्सवादरम्याने निर्माण होणारे कायदा व सुवव्यवस्थेचे प्रश्न् :-** भारतात विविध जाती धर्माचे लोक राहतात प्रत्येकाचे धर्माप्रमाणे आचार विचारातही भिन्नता अढळुन येते, दोन धर्मामधील रुढीपरंपरामध्ये मोठया प्रमाणात विरोधाभास जाणवतो. उदा हिंदु, मुस्लीम, दलीत, शिख धर्मामध्ये विविध करणांवरुन तेढ निर्माण होवुन जातीय दंगलींचा व दहशतवादी हल्ल्यांचा इतीहास आहे. अशा घटनांचा इतीहास पहाता बहुसंख्य दंगली या मुस्लीम, दलीत, हिंदु, शिख धर्मीय मोठया संख्येने राहत असलेल्या ठिकाणी, सर्व धर्मीयांचे ऐतीहासीक धार्मीक ठिकाणे, इत्यादी ठिकाणी घडलेल्या आहेत.

अशा दंगली घडविण्यामागे संबधीत धर्मातील समाजकंटक कारणीभुत असतात. समजाकंटक लोकांच्या धार्मीक भावना विविध मार्गाचा अवलंब करुन भडकवण्याचे काम करतात. त्यामुळे जातीय दंगली व दहशतवादी हल्ले होवुन मोठया प्रमाणात जिवीत व वित्त् हाणी होते.

असे प्रसंग घडु नये. त्याला वेळीच प्रतिबंध करणे करीता पोलीस विभागाने समाजकंटकावर वेळीच प्रतिबंधात्म्क कार्यवाही करणे बरोबर शांतता कमीटी, मोहल्ला कमीटी स्थापन करुन त्यामध्ये सर्व धर्मीय सदस्याची नियुक्ती करणे गरजेचे आहे. आगामी काळातील धार्मीक उत्स्व, कार्यक्रमांचे पुर्वी तसेच वेळोवेळी बैठका आयोजीत करुन सदस्यांसोबत सुसंवाद साधुन एकंदरीत परिस्थीतीचा आढावा घेणे गरजेचे आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न् निर्माण होईल अशी कोणतीही कृती घडणार नाही. या बाबत सदस्यांना मार्गदर्शन करावे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न् निर्माण झाल्यास होणारे जिवित व वित्त् हाणीची कल्पना सदस्यांना देणे गरजेचे आहे. तसेच कमीटीतील सदस्यांकडुनच समाजकंटकांची माहीती घेवुन मिळालेल्या माहीतीची खात्री करावी व त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही वेळीच करावी. सध्या अस्तीत्वात असलेल्या सोशल मिडीया, प्रसारमाध्यमे, यांचा वापर करुन जनतेशी संवाद साधुन शांतता राखण्याचे आव्हान करुन कायदेशिर कारवाईची जाणीव करुन देणे गरजेचे आहे. त्याच बरोबर ज्या ठिकाणी दोन समाजात, धर्मात नेहमी कोणत्याना कोणत्या कारणाने तेढ निर्माण होवुन दंगलीसारखे प्रकार घडताता अशा ठिकणी दोन्ही समाजात एकोपा निर्माण करणेसाठी सामुहीक कार्यक्रम, विविध स्पर्धा, सणावाराचे काळात भेटवस्तुंची देवाण घेवाण सारखे कार्यक्रम आयोजीत करुन दोन्ही समाजातील प्रतिष्ठीत नागरीकांना त्यामध्ये सहभागी करवुन

घ्यावे. त्याच बरोबर समजातील तेढ कमी करण्यासाठी, एकोपा निर्माण करणेसाठी सहाकार्य करणारे व्यक्तीचा सत्कार करुन त्यांचा गौरव करणे गरजेचे आहे जेणे करुन पोलीसांना कायदा व सुव्यवस्था राखणे व होणाऱ्यां गुन्हयांना वेळीच प्रतिबंध घालण्यासाठी अशा व्यक्तींना प्रात्साहन मिळते व ते पोलीसांची मदत करतात.

2) **सार्वजनिक निवडणुका :-** स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने भारतीय नागरिकांना दिलेल्या स्वातंत्र व सुरक्षिततेची हमी नियमती पणे आबादीत रहावी या करीता आपली शासन व्यवस्था हि  लोकशाहीच्या मार्गाने चालविली जाते. शासन चालविणे करीता लोकप्रतिनिधींची निवड लोकांमार्फतीने केली जाते. त्याकरीता देशात नियमीत पणे वेगवेगळया प्रकारच्या निवडणुकांचे आयोजन निवडणुक आयोगाचे वेतीने केले जाते. बदलत्या समाजव्यवस्थे प्रमाणे निवडणुकाचे स्वरुप सुध्दा दिवसोदिवस बदलत चालले आहे. निवडणुका काळामध्ये मोठया प्रमाणात दोन गटामध्ये भांडणे होवुन शरिराविरुध्दचे गुन्हे घडण्याची दाट शक्यता असते. अशा वादातुन जिवित, वित्त् हाणी होवुन समाजात कायदा व सुवव्यवस्थेचे प्रश्न् निर्माण होतात.

असे प्रकार घडु नये या करीता सुरवातीपासुनच कार्यक्षेत्रात पोलीसमित्र हि संकल्पना राबवुन स्वच्छ चारित्र् असलेल्या इसमांना पोलीस मित्र या योजनेत समाविष्ठ करुन घेतले पाहीजे त्यांचेशी वेळोवेळी संवाद साधुन त्यांना सर्वच बाबतीत पोलीस प्रशासनाला मदत करणेसाठी प्रोत्साहन दिला पाहीजे त्याच बरोबर वेळोवेळी त्यांनी केलेल्या चांगल्या कामांबद्दल त्यांचा गौरव केला पाहीजे. अशा पोलीस मित्रांचे मदतीने निवडणुक अथवा कोणत्याही कायदा सुवव्यस्थेच्या प्रसंगी समाजातील गोपनीय माहीती प्राप्त् करुन वेळीच योग्य ती खबरदारी घेता येते. त्याचबरोबर गावपातळीचे ठिकाणी पोलीस पाटील, सरपंच व गावातील इतर प्रतिष्ठीत व्यक्ती, शहरी भागात शांतता कमीटी, मोहल्ला कमीटी, चे सदस्य यांनाही सौजन्याची वागणुक देवुन त्यांचेशी नियमीतपणे सुसंवाद साधल्यास त्यांचे मदतीने निवडणुक काळामध्ये अथवा कोणत्याही सार्वजनिक प्रसंगी होणारे गुन्हे यांना वेळीच प्रतिबंध घालुन पोलीसांना कायदा व सुव्यवस्था राखण्यात मदत होते. परंतु कायदा व सुव्यवस्था राखणे करीता करण्यात येणारी कारवाई व सुसंवाद याचेमध्ये कोणत्याही प्रकारचा पक्षपातीपणा पोलीस विभागाकडुन होणार नाही याची दक्षता ठेवणे आवश्यक आहे.

3) **मालाविरुदध व शरिराविरुध्द घडणारे गुन्हे. :-** मालाविरुध्द व शरिराविरुध्द गुन्हे करणारे गट वेळोवेळी कार्यन्वीत होवुन चोरी, दरोडा, घरफोडी, रोड रॉबरी, सारखे गुन्हे वारंवार करत असतात. पोलीस दलातील तुटपुंज्या मनुष्यबळामुळे अशा गुन्हयांना प्रतिबंध घालणे पोलीस यंत्रणेला शक्य होत नाही यामुळे समाजात

असुरक्षीतेचे वातावरण तयार होवुन कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न् निर्माण होतात. यांना वेळीच आळा घालण्याकरीता ग्रामसुरक्षा दल ही संकल्पना राबवुन गाव व शहर या दोन्ही भागातील तरुणांना यात सहभागी करुन घेतले पाहीजे. त्यांचेशी सुसंवाद साधुन त्यांना गुन्हयांना प्रतिबंध घालणे करीता आवश्यक असलेल्या बाबींचे प्रबोधन करुन त्यांचा उत्साह वाढविणे आवश्यक आहे. त्याच बरोबर ग्रामसुरक्षा दलाचे मदतीने गुन्हे घडणारे परीसारत गस्त घालणे, नागरीकांनी अशा प्रसंगी ऐकमेकांना मदत करण्यासाठी प्रात्साहन देणे अशाप्रकाची कार्यवाही केली पाहीजे. पोलीस मित्रांचे मदतीने गोपनीय माहीती काढुन गुन्हे करणाऱ्यां समाजकंटकांवर वेळीच कार्यवाही केली पाहीजे. अशा प्रकारची कार्यवाही केल्यामुळे गुन्हयांना प्रतिबंध होवुन समाजात सुरक्षीतेतची भावना निर्माण होवुन पोलीस दलाबद्दल विश्वास निर्माण करणे शक्य होते.

4) **महीला व बालकाविरुध्द होणारे गुन्हे :-** आपल्या समजाता असे अनेक प्रकारचे विकृतबुध्दीचे लोक अढळुन येतात. असे लोक महीलांची छेडछाड, महीला व बालकांचे लैगिंक शोषण, अपहरण, अशा प्रकारचे गुन्हे करतात. अशा लोकांमुळे महीला व बालकांमध्ये असुरक्षीतेची भावना निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात. अशा प्रकारच्या गुन्हयांना आळा घालणे करीता सर्व सार्वजनिक ठिकाणे, महाविद्यालये, शाळा, इत्यादी ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षक, स्काउट गाईड, महाविद्यालयातील एनसीसी चे विद्यार्थी, व्यवसायीक, प्रतिष्ठीत नागरीक, शिक्षक, व पोलीस मित्र यांचेशी नियमीतपणे समन्वय व संवाद साधुन अशा प्रकारचे गुन्हे करण्याऱ्या समजाकंटकावर नजर ठेवुन त्यांचेवर प्रतिबंधाकत्क कारवाई करणे व घडणाऱ्या गुन्हयांना वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे.

# घटना

**पार्श्वभुमी :-** जळगांव जिल्हयातील यावल पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रात सालाबादा प्रमाणे चालत आलेल्या धार्मीक परंपरेनुसार बालाजी रथ उत्सवाचे हिंदु धर्मीय समजाकडुन आयोजन करण्यात येते. या उत्सवात नदीपात्रातुन 12 बैलगाड्या ओढण्याचा व मिरवणुक काढण्याचा कार्यक्रम करण्यात येतो. हि मिरवणुक मुस्लीम धर्मीयांचे प्रार्थनास्थ्ळ ( मशिद ) असलेल्य भागातुन मार्गक्रम होत असते. यावल येथे पाच टक्के मुस्लीम समाज व 95 टक्के हिंन्दु समाज वास्तव्यास आहे. विविध धार्मीक उत्सवांचे मिरवणुकी दरम्यान तणावाचे वातावरण निर्माण होवुन हिन्दु – मुस्लीम वाद होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र् निर्माण होतो.

**घटनेचे वर्णन :-** सन 2014 साली सालाबादाच्या पंरपरेनुसार सायंकाळी 17:00 वा. चे सुमारास बालाजी रथाच्या मिरवणुकीची हिंन्दु धर्मीयाकडुन तयारी करण्यात आली. मिरवणुक सुरु होणे अगोदरच शांतता कमीटीमध्ये सहभागी असलेल्या दोन्ही धर्मातील प्रतिष्ठीत नागरीकांची पोलीस ठाण्यात बैठक बोलावुन त्यांचेशी सुसंवाद साधुन त्यांना कार्यक्रमादरम्यान दोन्ही धर्मीयांनी शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले. सदर मिरवणुकीत सहभागी होणे करीता सात ते आठ हजार नागरीक हजर होते. त्याच वेळी मुस्लीम धर्मीय सुध्दा त्यांचे प्रार्थनास्थळी नमजा अदा करणेसाठी जमा झालेले होते.

मिरवणुक सुरु झाली. मिरवणुक मशिदीजवळ आली तेव्हा एका बैलगाडीचे चाक मशिदी जवळील गटारात अडकले. ते काढण्यासाठी बैलांना जोरात हकलले तेव्हा बैलगाडीचे जु मशिदीचे भिंतीवर आदळुन भिंतीचा काही भाग ढासळला. हा प्रकार योगायोगाने अथवा जाणीव पुर्वक घडलेला असावा. परंतु या प्रकारामुळे मोठया प्रमाणात तनावाची परिस्थीती निर्माण होवुन दोन्ही समाजामध्ये भांडण सुरु होवुन दंगल सदृष्य परिस्थीती निर्माण झाली. दोन्ही समाजातील तरुण मंडळी एकमेकांचे अंगावर धावुन जाण्याची तयारी करत हाते. त्याच वेळी बंदोबस्ताला असलेले पोलीस अधिकारी / कर्मचारी यांनी शांतता कमीटीच्या सदस्यांचे मध्यस्थीने दोन्ही समाजाशी सुसंवाद साधुन घडलेला प्रकार हा योगायोगाने घडलेला आहे. त्यामध्ये कोणत्याही स्वरुपात धार्मीक भावना दुखावण्याचा हेतु नव्हता असे समजावुन

सांगुन कायदा व सुसव्यवस्था राखण्यात यश मिळविले. मिरवणुक शांततेत पार पाडलेनंतर पुन्हा दोन्ही धर्मातील प्रतिष्ठीत नागरीकांची बैठक बोलावुन त्यांना शांतता कायम राखणे करीता पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आहवान केले.

एकंदरीत पोलीस प्रशासनाला सर्व प्रसंगी कायदा व सुव्यवस्था कायम ठेवुन समजामध्ये सुरक्षीततेची भावना निर्माण करणेसाठी व पोलीस विभागाबद्दल जनतेच्या मनात विश्वास निर्माण करणेसाठी प्रत्येक प्रसंगी समाजाला समाविष्ठ करुन घेणे गरजेचे आहे. त्यासाठी पोलीस विभागाला मदत करणारे प्रत्येक घटाकाचा सन्मान करणे, त्यांचेशी सौजन्याने वागणे, वेळप्रसंगी कायदेशिर मदत देणे. त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. समाजाचे सहभागाशिवाय कायदा व सुव्यवस्था राखणे पोलीस विभागाला शक्य नाही. म्हणुनच कायदा व सुव्यवस्था राखणे करीता पोलीस व जनता यांचेतील सुसंवाद याला अनन्यसाधारण महत्व आहे.